# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



## नगर अभियंता विभागाचे कामकाजाचे स्वरुप

नगर अभियंता कार्यालय कडील प्रमुख खाते 1) रस्ते विभाग 2) इमारती 3) झो.प.सुधारणा 4) विद्युत विभाग 5) भूमी व मालमत्ता विभाग 6) बांधकाम परवाना 7) स्टोअर व मशिनरी विभाग 8) अतिक्रमण

सोलापूर शहरामध्ये

1) रस्ते विभाग – सोलापूर शहरात राज्यस्तरीय नगरोत्थान योजने मधून एकूण 32 रस्त्यांची कामे चालू आहेत. याकामी जिल्हास्तर नगरोत्थान योजने अंतर्गत एम.एस.आर.डी.सीत झालेल्या पाच प्रमुख रस्त्यांची कामे पुर्नः डांबरीकरणाची कामे पूर्ण करणेत आलेली आहेत. अंतर्गत मोठे रस्ते याची कामेही जिल्हास्तरीय नगरोत्थान मधून काही पूर्ण तर काही कामे चालू आहेत. रस्त्याची कामे विभागीय कार्यालये क्रं.1 ते 8 मधून करणेत येतात.
2) इमारती – सोलापूर शहरात बी.ओ.टी अंतर्गत तीन मोठया बी.ओ.टी. च्या योजना सुरू आहेत. या व्यतिरिक्त सुवर्ण जयंती , सोलापूर म.न.पा. यातून म.न.पा. प्रशासकीय इमारती सुधारणा करणे. सोलापूर शहरामध्ये महाराष्ट्र नगरोत्थान जिल्हास्तर मधून बागा व स्मशानभूमीची कामे पूर्ण होणेच्या स्थितीत आहे.
3) झोपडपट्टी सुधारणा – सोलापूर शहरामध्ये दोन झोपडपट्टयाचे आय.एच.एस.डी.पी. अंतर्गत इमारतीचे बांधकामे पूर्ण झाले आहेत. एकूण 460 लाभार्थ्यांना या झोपडपट्टीतील लाभार्थ्यांना पक्क्या घराचा लाभ मिळाला आहे. यापैकी जगजीवन झोपडपट्टी 88 लाभार्थी यांना घरकुलाचे वाटप केले आहे. 2011 पासून नवीन घरात राहत आहेत व भगवान नगर झोपडपट्टीतील 371 लाभार्थ्यांना घरकुले वाटप करणेचे नियोजन आहे. रमाई आवास योजनेअंतर्गत 710 लाभार्थ्यांना घरकुलाचे लाभ मिळाला आहे. या व्यतिरिक्त 10008 वैयक्तिक शौचालये व बांधकामे बांधून देणेत आलेले आहेत.

4) भूमी व मालमत्ता शहरातील मेजर गाळे व मिनी गाळयांचा भाडे व वसुलीचे काम केले जाते.

5) बांधकाम परवाना ॲटो डी.सी.आर च्या माध्यामातून बांधकाम परवानाची कार्यवाही करणेत येते. जास्तीत जास्त नागरिकांना याचा फायदा होतो. नगर रचना अधिनियम कलम 1966 तरतुदीच्या अनुषंगाने विकास परवाना देणेची कार्यवाही ठेवणेत येते.
6) स्टोअर व मशिनरी विभागाकडून दैनंदिन विविध प्रकारच्या दुरूस्त्या आपत्कालीन या कामासाठी मशिनरी विभागाकडे 10 डंपर, 7 जे.सी.पी. शहराच्या सेवेत आहेत. यांचे माध्यमातून शहरातून विविध कामे केले जातात.
7) अतिक्रमण विभागाकडून शहरातील रस्त्यावरील अतिक्रमणे काढली जातात. त्याच बरोबर विना परवाना बांधकाम काढणे, धोकादायक इमारती पाडणे, आवश्यकतेनुसार तेथील यंत्रणा वापरून त्यामध्ये पोलीस विभाग यांच्या मदतीने अन्य कामे केली जातात.